Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

Original Article

समाजमनाशी संवाद साधणारी कविता: जगणं होईल हिरवंगार

प्रा. डॉ. व्यंकटी पावडे
मराठी विभागप्रमुख, के आर एम महिला महाविद्यालय, नांदेड
Email: vyankatipawde@gmail.Com

Manuscript ID:
JRD -2026-180729
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 7
Pp. 143-147
July- 2026
Submitted: 16 June. 2026
Revised: 26 June. 2026
Accepted: 11 July. 2026
Published: 31 July. 2026

सारांश

'समाजमनाशी संवाद साधणारी कविता: जगणं होईल हिरवंगार' या संशोधन लेखामध्ये जगणं होईल हिरवंगार या काव्यसंग्रहातील कवितांद्वारे व्यक्त झालेल्या सामाजिक, मानवी आणि पर्यावरणीय मूल्यांचा अभ्यास करण्यात आला आहे. या कवितांमध्ये सामान्य माणसाचे जीवन, निसर्गाशी असलेले नाते, सामाजिक संवेदनशीलता, आशावाद, संघर्ष, समता, मानवी मूल्ये आणि सकारात्मक जीवनदृष्टी यांचे प्रभावी चित्रण आढळते. कवीने समाजातील विविध प्रश्नांवर भाष्य करताना वाचकांशी थेट संवाद साधण्याचा प्रयत्न केला असून, समाजपरिवर्तनाची प्रेरणा देणारा आशय मांडला आहे. या संशोधनात काव्यसंग्रहातील आशय, भाषा, शैली, प्रतिमासृष्टी आणि सामाजिक जाणिवांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. तसेच या कवितांचे समकालीन समाजजीवनाशी असलेले नाते आणि समाजमनाला जागृत करण्यातील त्यांचे योगदान स्पष्ट करण्यात आले आहे. प्रस्तुत अभ्यासातून जगणं होईल हिरवंगार हा काव्यसंग्रह केवळ साहित्यिक मूल्यांनी समृद्ध नसून सामाजिक प्रबोधन, पर्यावरण-जागर आणि मानवी संवेदनांच्या जतनासाठी महत्त्वपूर्ण ठरतो, हा निष्कर्ष अधोरेखित होतो.

की-शब्द: *समाजमन, जगणं होईल हिरवंगार, सामाजिक कविता, पर्यावरण-जागर, मानवी मूल्ये, समकालीन समाज, जीवनदृष्टी, सामाजिक संवेदना.*

प्रस्तावना

साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक आणि बालसाहित्यिक कवी एकनाथ आव्हाड हे मराठी साहित्यातील एक नावाजलेले लेखक आहेत. मुलांसाठी त्यांनी कथा, कविता, नाट्यछटा, चरित्र, काव्यकोडी इत्यादी साहित्य प्रकारामध्ये प्रबोधनात्मक व दर्जेदार लेखन केले आहे. त्यांचे जवळपास 40 ग्रंथ प्रकाशित असून काही पुस्तकांचे हिंदी, इंग्रजी भाषेत व ब्रेल लिपित अनुवाद झाले आहेत. महाराष्ट्रातील शाळा, महाविद्यालय आणि अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमामध्ये त्यांच्या कवितांचा समावेश झाला आहे. तीन दशकाहून अधिक काळ ते ज्ञानदानाच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. साहित्यक्षेत्रात त्यांनी केलेल्या विपुल लेखनाबद्दल त्यांना महाराष्ट्र शासन व अनेक नामवंत संस्थांचे पुरस्कार लाभले. एक हजाराहून अधिक कथाकथनाचे कार्यक्रम त्यांनी यशस्वी केले आहेत.। विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांचा हिरीरीने सहभाग असतो. कलासक्त माणूस म्हणून त्यांची सर्वदूर अशी ओळख आहे. कवी, लेखक जेवढा अधिक समाजामध्ये रुजला त्याचे पाय जमिनीवर जेवढे अधिक घट्ट जोडले गेले, तेवढेच दर्जेदार व वास्तववादी साहित्य त्याच्या लेखणीतून प्रकटत असते. हलगी अग्नीवर शेकली की तिच्यातून खरा स्वर बाहेर पडतो लेखकाचेही तसेच आहे. साहित्य व समाज याचे एक अतूट नाते असते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा. डॉ. व्यंकटी पावडे, मराठी विभागप्रमुख, के आर एम महिला महाविद्यालय,नांदेड

How to cite this article:
पावडे, व्यंकटी. (2026). समाजमनाशी संवाद साधणारी कविता: जगणं होईल हिरवंगार. Journal of Research and Development, 18(7), 143–147. https://doi.org/10.5281/zenodo.21943580

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21943580
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

लेखकाला समाज मनाची वेदना ऐकू येत असते. त्या वेदनेतूनच साहित्याचा जन्म होतो. कवी एकनाथ आव्हाड यांचे काव्य हे वेदनेतून जन्मलेले साहित्य आहे. 'जगणं होईल हिरवंगार' हा 55 कवितांचा व 96 पृष्ठांचा कवितासंग्रह आहे. वर्तमान समाज जीवनाबद्दलची भलीबुरी प्रतिक्रिया त्यांनी या संग्रहात व्यक्त केली आहे.साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त बालसाहित्य कवी डॉ. सुरेश सावंत यांची मर्मभेदी प्रस्तावना, मधु मंगेश कर्णिक यांची अर्थपूर्ण पाठराखण आणि कलाप्रेमी चंद्रमोहन कुलकर्णी यांचे बोलके मुखपृष्ठ या काव्यसंग्रहाला लाभले आहे.या त्रिवेणी संगमामुळे या कवितेची उंची अधिक वाढली आहे. राजहंस प्रकाशन पुणे यांनी हा काव्यसंग्रह प्रकाशित केला असून या संग्रहातील कविता कवी मनातील भावभावनांचा निचरा करणाऱ्या आहेत.

सामाजिक व वैयक्तिक जाणीवेचा स्पर्श झालेली ही कविता समाजाकडे उघड्या डोळ्यांनी पाहते. निरागस बालमने, शाळा, निसर्ग, बोथट झालेली समाजमने, आटत जाणारी माणुसकी, नैतिक मूल्यांची झालेली पडझड, आईचे महात्म्य, सामाजिक व्यवस्था, भ्रष्ट लोकशाही, आधुनिक जीवनशैलीचा मानवी जीवनावर झालेला गंभीर परिणाम इत्यादी बाबी या कवितेत येतात. 'माणूस' आणि 'मानवता' या मूल्यांवर आढळ श्रद्धा असल्यामुळे हे जगणं होईल हिरवंगार अशी या कवीची धारणा आहे. बालमनावर नैतिक मूल्यांचे संस्कार करू पाहणारी ही कविता, उज्वल भारताची नवी पिढी उर्जावान, निकोप आणि मानवतावादी निर्माण व्हावी यासाठी धडपड करते, म्हणून ही कविता उद्विग्न आणि दिशाहीन झालेल्या समाजामध्ये मानवतेचा उजेड पेरणारी आहे.

'माणूस' हा केंद्रबिंदू मानून या कवितेचे लेखन झाल्याचे दिसते. सभोवतालच्या वर्तमान जीवनातील प्रश्नांचे गडद चित्र ही कविता उभी करते. सामाजिक विकासाचे ढोल बडवणाऱ्या समाजात माणसाने खुप वैज्ञानिक क्रांती केली. चंद्रयान, मंगळयान पूर्ण केले. नवनवे शोध लावले. यंत्र तंत्रात प्रगती केली; पण माणुसकी कशी गमावली, हे या कवितेने वास्तवपणे दाखवून दिले. सभोवताली प्रचंड गर्दी असताना माणूस एकटा एकटा का होत चालला आहे? हा या कवीचा अंतर्मुख करणारा सवाल या कवितासंग्रहात येतो. पैसा आला, उंच उंच इमारती बांधल्या गेल्या पण समाजातील माया ममता,प्रेम वात्सल्य, कुठे गेले? हा या कवीचा सवाल आहे. संगणक युगातील तंत्रस्नेही पिढीने माणुसकी कशी गमावली, दिवसेदिवस माणूस माणसापासून कसा दुरावत चालला आहे, त्यामुळे जगणे कसे कोरडे होत जात आहे, हे भयावह सामाजिक वास्तव या कवितेने व्यक्त केले. हरवलेला संवाद, संगणक युग या कवितेतून हे दुःख अधिक गहिरे होते. स्वार्थामुळे आंधळया झालेल्या समाजात कृतज्ञता कशी हद्दपार झाली, समजूतदारपणाची गैरहजेरी का वाढत आहे. वैर,हेवेदावे,बदल्याची भावना का वाढते? स्वतःला स्मार्ट समजणारी ही पिढी नेटली कनेक्ट असली तरी कौटुंबिक नातेसंबंधात किंवा समाजभावनेत ती नीटली कनेक्ट का होत नाही. ही खंत या कवीने व्यक्त केली आहे. स्वतःचा हेतू साध्य झाला की, नातेसंबंध नको म्हणणारी ही स्मार्ट पिढी समाजाला कोणत्या दिशेने घेऊन जात आहे. हे सामाजिक वास्तव या कवितेने उजागर केले आहे. माणसाच्या मनातील सर्व षडविकार संपून जावोत आणि समाजात कृतज्ञता वाढावी यासाठी सर्वात प्रथम त्याची सुरुवात आपल्यापासून करावी असे कवी एकनाथ आव्हाड यांना वाटते.

हा विश्वात्मक भाव व्यक्त करताना 'प्रभू... माझी कृतज्ञता बावन्नकशी राहू दे!'(पृ. 23) ही कवीने देवाकडे केलेली प्रार्थना याची साक्ष वाटते. 'खरंच...समजूतदारपणाची गैरहजेरी लागली की, सगळंच कसं भयंकर होऊन जातं'(पृ. 32) ही मनातील सामाजिक वेदना मांडताना मानवी आयुष्यातील समजूतदारपणाचे महत्त्व समजावून दिले. जगणं होईल हिरवंगार या काव्यसंग्रहातील कवितेत मानवी दुःख येते.नदी, निसर्ग, पाऊस, ऊन, वारा, शेती, शेतकरी, गाव, मानवी मौन, झाड, हरवलेला संवाद आणि आधुनिक जगात विखुरलेला माणूस इत्यादी विषय येतात. विठ्ठल, कृष्ण ह्या देवदेवता आणि सविता पटेकर यांच्यासारख्या विद्यार्थिनी येतात. जशी नदी अनंत अडचणीतून डोंगरदऱ्यातून मार्ग शोधून समुद्राला मिळते. सर्व प्रतिकूलतेवर मात करून काडी काडी जमवून पक्षी घरटे विणतो, गडद अंधाराला भेदून सूर्य उगवतो व ही सृष्टी प्रकाशमान करतो. हे निसर्गातील सर्व घटकांना शक्य आहे तर माणसांना ते का जमत नाही? अहंकार, 'मी' पणा कशासाठी? हा जगण्या भोवतालचा सवाल या कवितेने उभा केला, केवळ सवालच न विचारता हे जग सुंदर करण्यासाठी माणसाने वर्तनात बदल कसा करावा हे शिकविले आहे. म्हणून ही कविता सामाजिक प्रबोधन करणारी आणि माणसाच्या जीवनात परिवर्तन घडविणारी आहे.

या कवितेला सामाजिक प्रश्नांचे जसे वेड आहे तसे ही कविता कौटुंबिक जिव्हाळ्याने व्याकुळलेली आहे. जन्मदात्री आई आणि कवी यांच्यातील मुक्तसंवाद हे त्याचे प्रतीक आहे. पहिला पगार, संप, प्रकाशाची वाट, हरवलेला संवाद, डेरेदार झाडाची सावली, आईचे तत्त्वज्ञान, पाऊस आणि आई,सोबत,संगणक युग अशा काही कवितेतून कवी मनातील आई बद्दलची कृतज्ञता व्यक्त होते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

आईने केलेल्या संस्कारामुळेच मी आयुष्यात भक्कम उभा आहे, ही कवी मनातील जाणीव या कवितेला ऐश्वर्य प्राप्त करून देते. 'कष्टाला अहंपणा चिकटवू नकोस, यश तेव्हाच शोभून दिसेल'(पहिला पगार पृ. 22), 'जगाशी बोलायला धावताना, आधी स्वतःशी बोल, थोडा वेळ काढून, आतला आवाज ऐक, अधीर होऊन'(हरवलेला संवाद पृ. 47) 'आयुष्याची वाट तुडवताना, माणसांना जर वाटेत सौख्याच्या बिया पेरल्या ना, तर जगण्याचं समाधान लाभतं त्याला'(आईच तत्त्वज्ञान पृ. 52) 'आयं डोळं का ग लाल झालं तुझं एवढं, आभाळागत तू ही रडत होतीस का? (पाऊस आणि आई पृ. 61) 'तिचे घरात पाऊल पडतात, सूर्यप्रकाशाची तिरीपही आली घरात' (संप पृ.27) अशा काही कवितेतील ओळीमधून आईचे कवीच्या जीवनातील महात्म्य प्रगट होते. ही आई कवीच्या बालमनावर संस्कार करणारी, वेळप्रसंगी रागावणारी,भांडणारी, स्वतःचे दुःख स्वतः सहन करणारी, कुटुंबासाठी धडपडणारी, दुःख दारिद्र्य भोगणारी,शेतात कष्ट वेचणारी आणि स्वतःचे दुःख पावसाला सांगणारी आहे. ही आई जेव्हा पावसात रडते तेव्हा कवी मनाच्या दुःखाला पारावर उरत नाही. तिचे लाल डोळे हे वेगळ्या प्रतिमेतून येतात. ही आई कष्टाळू व निरक्षर जरी असली तरी तिने जगण्याचे तत्त्वज्ञान आपल्या लेकराला सांगितले आहे.

समाज मनाशी संवाद साधणारी ही कविता सरळ व सोपी आहे. ती वाचकांच्या हृदयाला सहज भिडते.या कवितेतून जगणं सोपं करण्याचा मूलमंत्र दिला आहे. ती माणसाला निराशेच्या चक्रव्यूहातून बाहेर काढते व सकारात्मक जीवनदृष्टी बहाल करते आणि अंधाराकडून प्रकाशाकडे नेते, म्हणून ही कविता मानवी कल्याणसाठी रचिली गेलेली कविता आहे. 'तुम्ही कसं विचारू शकता' या कवितेतून उद्ध्वस्त होत जाणाऱ्या गावाची व्यथा वेदना कवी एकनाथ आव्हाड यांनी वास्तवपणे मांडली आहे. शेत शिवार पाण्याविना बकाल झालेत. माणसांच्या स्थलांतरामुळे गावात चिटपाखरू नाही. जनावरांचा गोठा रिकामा झालाय. दुष्काळाच्या झळा गावाला आणि आयुष्याला अजगरासारखा वेटाळून बसलाय. त्यामुळे गाव शिवार ओस झालीत, ही खंत या कवीने या कवितेतून नेमकेपणे मांडली आहे. 'यंदा गावात' या कवितेतून अतिवृष्टीच्या महापुराने उद्ध्वस्त झालेल्या पिकांचे चित्रण येते.'आभाळमाया' या कवितेत पावसाने दडी मारल्याने शेतातील कोवळे कोंब कसे करपून सुकून जातात हे ओसाड शेताचे दुःख येथे व्यक्त होते. पावसाच्या येण्याने व न येण्याने शेत शिवार व गावावर कोणते संकट व दुःख येते ते या कवितेत मांडले आहे.

मध्यमवर्गीय माणसांच्या जगण्यातील दुःख शोधताना ही कविता अस्वस्थ होते. त्यासाठी ती 'कृष्ण' व 'विठ्ठल' या देव देवतांचा संदर्भ शोधते. 'तूही अस्वस्थ होतोस तेव्हा' या कवितेतून कृष्णाने अनंत संकटावर कशी मात केली आणि या सृष्टीवर आनंद निर्माण केला;पण वर्तमान काळात आज साक्षात श्रीकृष्ण आला तर मानवा मानवातील दुरावा पाहून तोही अस्वस्थ होईल ही चिंता या कवितेत व्यक्त केली आहे. हा कवी सर्वांचे जगणे हिरवेगार करण्यासाठी पंढरपूरच्या विठ्ठलाला याचना करतो. विद्यार्थी व त्याचे भवितव्य हा या कवीचा श्वास आहे.वर्गात सतत गैरहजर असणाऱ्या सविता पटेकर या विद्यार्थिनीला वर्गात उपस्थित राहण्यासाठी प्रेरित करणारा ज्ञानदाता शिक्षक या कवीस श्रेष्ठ वाटतो. 'तूच एक कविता!' ही कविता कष्टाने, विवंचनेने, दारिद्र्याने दबलेल्या पण शाळेत रमणाऱ्या मुलीची वेदना मांडणारी आहे. या मुलीची अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी लढा चालू आहे. त्यासाठी ती वर्गातील गुरुजींना माझ्यावर कविता लिहा असा आग्रह धरते. तेव्हा गुरुजी तूच एक कविता आहेस असे उत्तर देतात. तेव्हा सामान्यांचे दुःख उचंबळून येते, या कवितेत येणारी मुलगी हे एक प्रतीक आहे, अशी असंख्य कुटुंबे दारिद्र्यात जगणारी असून त्यांचे दुःख हलके व्हावे तेव्हाच माझा काव्य लेखनाचा वसा सार्थक होईल असे या कवीस वाटते. म्हणून कवी एकनाथ आव्हाड यांची कविता मानवी दुःखाभोवती फिरणारी आहे.

'असे ही जाणवते' या कवितेतून मानवी जगण्यातील धावपळ येते. संवादहीन व करिअरच्या नावाने व्यस्त असलेल्या नव्या तंत्रस्नेही पिढीत माणुसकी कशी आटत चालली आहे, ही खंत व्यक्त होते. भारतीय समाजातील विद्वान, श्रीमंत माणसे,राजकारणी इत्यादींचा वाढलेला 'मी' पणा 'अहंकार' यामुळे समाज भयभीत झाला असून प्रेमाचा महावृक्ष कसा डवरेल हा कवीचा सवाल आहे, त्यासाठी मनाची मशागत हवी आहे. प्रेमाचे चार फुलं उधळण्यासाठी वेळ आहेच कुणाकडे? हा कवीचा बिझी असणाऱ्या या पिढीला प्रश्न आहे. ते या कवितेत सुन्न मनाने लिहितात,

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

श्रीमंत आपल्या धनसंपत्तीचा
सत्ताधीश आपल्या खुर्चीचा
विद्वान आपल्या विद्वत्तेचा
अहंकार जसजसा जपत जातो
तसतशी त्यांच्या अंतकरणातील
प्रेमाची बीज नष्ट व्हायला लागतात
अशावेळी
त्यांचे तकलादू मोठेपणच
त्यांना अधिक खुजे करून टाकते
(असेही जाणवते पृ.63)

या कवितेतून भरकटत चाललेल्या स्वार्थी, अहंकारी व 'मी' पणात बुडालेल्या समाजाचे वास्तव चित्र प्रकट होते.

जगणं होईल हिरवंगार या काव्यसंग्रहामध्ये विद्यार्थ्यांचे मनोविश्व साकार करणाऱ्या काही कविता येतात. या कवितेतून बालमनातील भावविश्व उभे राहते.त्यांच्या मनातील चिंता व्यक्त होते. 'तूच एक कविता!' मधील मुलगी दारिद्र्यामध्ये जगणारी; पण भविष्याचे भान असणारी आहे. 'सविता पटेकर... सतत गैरहजर!'ही कविता धुनीभांडी करणाऱ्या बाईच्या एका आळशी मुलीची मनोवस्था प्रकट करते. 'देऊळ' या कवितेत शाळा शिकून मोठी झालेल्या मुलीचे समंजसपण येते. 'स्वागतशील' या कवितेत शाळेच्या चिरेबंदी भिंतीत अडकलेल्या, पाठीवर दप्तरांची ओझे घेऊन पळत सुटलेल्या व निरागस प्रश्न विचारणाऱ्या प्रेमळ बाल मुलांचे स्वगत येते. ही लहान बालके भवितव्याबद्दलच्या पालक व गुरुजींच्या प्रश्नांनी भांबावलेली आहेत. या सर्व चिमुकल्या जीवाकडे पाहण्याची कवीची एक प्रांजळ व समंजस वृत्ती आहे. या बालकांच्या जीवनात कवी एकनाथ आव्हाड हिरवळ आणू पाहतात हे कवीच्या मनाचे मोठेपण येथे अधोरेखित होते.

समग्र सृष्टीचे जीवन सुंदर व्हावे. हा या कवीचा ध्यास आहे. 'प्रकाशाची वाट' या कवितेतून ती साक्ष अधिक गडद होते. या कवितेत कवीच्या मनाची विशालता किती व्यापक आहे. ती विश्व कल्याणाचा विचार कसा करते ते लक्षात येते.

आपल्यालाही असंच
झाडासारखं रुजून येता आलं
नदीसारखं पुढे जाता आलं
आभाळासारखं विशाल होता आलं
अन पाखरासारखं
चिवटपणे जगण्याला तोंड देता आलं की,
जगणंही आपल्याकडे हरखून पाहतं
अशावेळी अंगावर धावणाऱ्या अंधारालाही
निक्षून परतवून लावता येतं (प्रकाशाची वाट पृ. 42)

संवेदनशील मनाने समाजभान ठेवून लिहिलेली ही कविता मध्यमवर्गीय माणसाच्या जगण्यातील ताणेबाणे शोधणारी आहे.फेसबुकच्या आभासी जगातील हजारो मित्र. इंस्टाग्रामवरील चर्चा, ट्विटर वरील संदेश या आभासी जगात माणूस तासनातास रमून बसतो; पण शेजारी असलेल्या माणसाला संवाद साधत नाही. या आधुनिक युगातील तंत्रस्नेही मंडळी प्रत्यक्ष भेटीपेक्षा आभासीपणाला कशी भुलते, त्यामुळे समाजातील माणुसकी कशी मरत चालली आहे ही भावनिक साद या कवितेत येते.'संगणक युग', 'ऑनलाइन', 'दोन शब्द' आणि इतर काही कवितामधून या कवीने नेमकेपणे व्यक्त केले आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

कवी एकनाथ आव्हाड यांनी लिहिलेली 'मौन' ही कविता जगण्यातील भेदक व भेसूर तत्त्वज्ञान सांगते. जेव्हा हा सभोवताल नकोसा होतो. माणसं अप्रिय वाटतात,नात्यागोत्याचे बंध तुटतात. जीवन कंटाळवाने बनते. सर्वत्र अविश्वास वाढतो.तेव्हा 'मौन' सर्वात चांगले असते, असे या कवीस वाटते. ही कविता लिहिताना या कवीचा स्वर जड होतो तो दुःखात बुडतो.मग ते असे लिहितात,

मनाच्या अशांत कल्लोळात
मौनाची मात्रा लागू पडते
म्हणूनच…
मौनाची शिदोरी हवी सोबत
गप्प बसण्यात नसतो
पळपुटेपणा
मौनसुद्धा करतं
समोरच्याला अस्वस्थ
खरंच…
वाढत जाणाऱ्या कोलाहलात
पुन्हा सांगायला हवं
मौन सर्वार्थ साधनम! (मौन पृ. 39)

कवी एकनाथ आव्हाड यांच्या कवितेची भाषा वाचकांच्या हृदयाला सहज भीडणारी आहे. ती साधी सोपी व सरळ आहे. या भाषेला संवादाचा स्पर्श झाला आहे.ती दैनंदिन जीवनातील रुदन प्रगट करणारी आहे. या भाषेला विद्रोहाची गोडी नाही. ती आपले म्हणणे संयतपणे व्यक्त करते. या भाषेत कुठेही विद्रोह, संताप, चीड, मनस्ताप अथवा आक्रस्ताळेपणा नाही. तिला भाषेतील अलंकाराचा किंवा गुंतागुंतीचा मोह नाही. नाहकपणे येणाऱ्या रूपक, अलंकार, प्रतीक, प्रतिमा यात ती अडकत नाही. भाषेचा तोल ती कुठेही जाऊ देत नाही. ती अश्लील नाही तिच्यात एक समंजसपण व जीवनाचे गांभीर्य आहे.ती शब्दांच्या जंजाळात अडकत नाही.आशयघनता व सामाजिक प्रबोधन हे तिचे मुख्य वैशिष्ट्य आहे. ही कविता सभोवतावलावर प्रेम करणारी आहे. समग्र मानवाचे कल्याण व्हावे आणि सर्वांचे जगणे हिरवेगार करण्यासाठी तिचा ध्यास आहे.माता पिता, मित्र, पुस्तक, शेती शेतकरी, मैत्री, निसर्ग, शाळा, विद्यार्थी, झाडे झुडपे, नदी यांच्यावर ती भरभरून प्रेम करते. माणूस, मानवता आणि माणुसकीवर तिची अपार श्रद्धा आहे. कृष्ण आणि पांडुरंगाबद्दल तिच्या मनात ओढ आहे. बुद्धाची करुणा तिला जवळची वाटते. महात्मा गांधीजींचे अहिंसेचे तत्वज्ञान तिने स्वीकारले आहे. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मानवता तिला हवी आहे.म्हणून ही कविता मानवी मूल्यांचा जागर करणारी व जीवनावर अपार प्रेम करणारी आहे.त्यामुळे निश्चितच या कवितेने मराठी काव्य परंपरा समृद्ध केली असून ती वाचक, रसिकांना दिशा व प्रेरणा देणारी आहे म्हणून सर्वत्र या कवितेचे स्वागत होईल, ही मनोमन आशा आहे.

संदर्भ:

जगणं होईल हिरवंगार, एकनाथ आव्हाड, राजहंस प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती 27 फेब्रुवारी 2026, पृष्ठ 96, मूल्य 160